| | HOSPITAL TRAINING CENTRE, C.P.R. HOSPITAL, KOLHAPUR | | | |
|---|---|---|---|---|
| | *Medical officer Class - 1*<br>*Telephone No.(p)*<br>*Office Telephone No.* | *2641944*<br>*2611944* | Medical officer CL-1 Hospital Training Centre,C.P.R.Kolhapur<br>HEMR Building, Dasara Chowk, Kolhapur 416 002.<br>Email : htckolhapur2@gmail.com | |


No.HTT/NHM/ Quotation Notice / 457 /2025 Date 17 / 04/2025.

# जाहिर सुचना

**विषय :- प्रशिक्षण सत्राकरिता व कार्यालयीन सभा/कार्यशाळेकरिता आहार सेवा पुरवठा करणेबाबत...**

वैद्यकिय अधिकारी वर्ग १, रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र, सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर या कार्यालयास आवश्यकतेनुसार विविध प्रकाराची प्रशिक्षण सत्रे, विविध सभा व कार्यशाळा इ. साठी चहा, नाष्टा व जेवण पुरवठा करणेकामी पुरवठादार निश्चित करावयाचा आहे. याकरिता मान्यताप्राप्त व इच्छुक स्थानिक बाजारातून नोंदणीकृत संस्थेच्या पुरवठादारांकडून खालीलप्रमाणे सीलबंद लखोटयात दरपत्रक मागवणेत येत आहेत. आपलेकडुन दरपत्रक सादर करीत असताना सीलबंद लखोटयावर **"Medical officer (Class-1), Hospital Training Centre, CPR Kolhapur"** यांचे नांवे "**Quotation for Tea, Breakfast, Lunch / Rate Contract**" असा उल्लेख केलेला असावा. दरपत्रक कार्यालयीन वेळेत समक्ष किंवा पोस्टाने आठ दिवसांच्या आत दिनांक २५/०४/२०२५ रोजी दुपारी ०५.०० पुर्वी मिळतील असे पाठवावे. मुदतीनंतर आलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत. टपालाने अथवा कुरिअर सेवामार्फत पाठविणेत आलेली दरपत्रके विलंबाने प्राप्त झालेस या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.ती रद्द करणेत येतील.

**<u>दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या संस्थेच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.</u>**

१) पुरवठादाराने सिलबंद लिफाफयामध्ये स्वयं साक्षांकित केलेली वैध प्रमाणपत्रे पुढीलप्रमाणे सादर करावीत.

- ✓ व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट प्रमाणपत्र
- ✓ GST नोंदणी प्रमाणपत्र (GST नोंदणी नसलेस चॅर्टर्ड अकौन्टट् यांचे प्रमाणपत्र)
- ✓ पॅन कार्ड
- ✓ मागील दोन वर्षात (२०२२-२३ व २०२३-२४) सरासरी वार्षिक उलाढाल र.रु.५ लाखांपेक्षा जास्त असलेचे सी.ए.चे प्रमाणपत्र
- ✓ अन्न व औषध प्रशासनाचा दाखला
- ✓ विहित नमन्यातील दरपत्रक मागणी दोन वर्ष आयकर विविरणपत्र दाखल केलेबद्दल ITR-V (मागील दोन आर्थिक वर्षाची २०२२-२३, २०२३-२४)
- ✓ काळया यादीत नाव नसलेबाबत स्वयंघोषित दाखला
- ✓ दरांचा विहीत नमुना अटी व शर्तीमान्य असलेबाबत निवीदाधारकाची सही व शिक्का सहीत
- ✓ प्रपत्र अ

## दर भरावयाचा विहित नमुना (प्रपत्र अ)

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित दर (रुपये) | अंतिम दर रुपये (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १ | साधा चहा ( १ कप -१०० मी.ली) | ०६ | |
| २ | स्पेशल चहा ( १ कप -१०० मी.ली) | ०८ | |
| ३ | कॉफी ( १ कप -१०० मी.ली) | २० | |
| ४ | बिस्किट पुडा (८ नग) | ५ | |
| ५ | पोहे- १ प्लेट | १५ | |
| ६ | शिरा - १ प्लेट | १५ | |
| ७ | उपमा - १ प्लेट | १५ | |
| ८ | समोसा -१ नग सोबत १ वाटी चटणी/सॉस | १५ | |
| ९ | इडली ( २ नग ) सोबत १ वाटी चटणी/सांबार | २५ | |
| १० | उडीदवडा ( २ नग ) सोबत १ वाटी चटणी/सांबार | २५ | |
| ११ | बटाटेवडा पाव - १ वडा व १ पाव | २० | |
| १२ | कटवडा पाव - १ कटवडा व २ पाव | ३५ | |
| १३ | मिसळ - १ प्लेट मिसळ व दोन पाव | ३५ | |
| १४ | अंडा ऑम्लेट - १ ऑम्लेट व दोन पाव | ३५ | |
| १५ | पावभाजी - १ प्लेट पावभाजी व दोन पाव | ४० | |
| १६ | खिचडी - १ प्लेट साबुदाण्याची खिचडी व दोन केळी | ३५ | |
| १७ | शाबुवडे - २ नग साबुदाणे वडे व १ नग वेफर्स पाकीट | ३५ | |
| १८ | व्हेज पुलाव | ४० | |
| १९ | मिनी शाकाहारी थाळी अमर्यादित (प्रति ताट दर)<br>चपाती/भाकरी, भात, वरण किंवा आमटी, एक भाजी, कोशिंबिर किंवा लोणचे इ. | ४५ | |
| २० | साधी शाकाहारी थाळी अमर्यादित (प्रति ताट दर)<br>चपाती/भाकरी, मसाले किंवा पुलाव भात, वरण किंवा आमटी, एक भाजी, कोशिंबिर किंवा लोणचे, पापड,दही वाटी( १ नग) किंवा ताक किंवा मठ्ठा इ. | ८० | |
| २१ | स्पेशल शाकाहारी थाळी अमर्यादित (प्रति ताट दर) स्वीटसह<br>पुरी/चपाती, मसाले/पुलाव भात/जीरा राईस, दालफ्राय (आमटी),दोनभाजी(पनीरमसाला/काजूमसाला/आलुमटार/पालेभाजी/फळभाजी/कडधान्याचीभाजी)सॅलेड/कोशिंबिर/लोणचे,पापड, स्वीटवाटी-बासुंदी/श्रीखंड/गुलाबजामुन/जिलेबी/आम्रखंड/फ्रुटकस्टर्ड इ. | १२० | |
| २२ | अंडाकरी थाळी अमर्यादित (प्रति ताट दर)<br>चपाती/भाकरी/रोटी, मसाला राईस, अंडाकरी (२ अंडी), रस्सा कांदा, लिंबु. | ८५ | |
| २३ | चिकन मसाला थाळी अमर्यादित (प्रति ताट दर)<br>चपाती/भाकरी/रोटी, मसाला राईस, चिकन मसाला, तांबडा पांढरा रस्सा, कांदा, लिंबु. | १५० | |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | मटण मसाला थाळी अमर्यादित (प्रति ताट दर)<br>चपाती/भाकरी/रोटी, मसाला राईस, मटण मसाला, तांबडा पांढरा रस्सा, कांदा, लिंबु. | २१० | |
| २५ | आईस्क्रिम ( १ कप -१०० मी.ली) | २० | |
| २६ | पॅकेज्ड् ड्रिंकींग वॉटर बॉटल ( १ बॉटल -५०० मी.ली) | १० | |
| २७ | पॅकेज्ड् ड्रिंकींग वॉटर बॉटल ( १ बॉटल - १ लिटर) | २० | |

**अटी व शर्ती :-**

१) ई-दरपत्रक प्रक्रिया राबविताना ज्या पुरवठादाराचे दर सरासरीने इतर पुरवठादारापेक्षा कमी प्राप्त होतील त्या पुरवठादाराची निवड केली जाईल.

२) सशर्त दरपत्रक विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३) ज्या दरपत्रकामध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दरामध्ये संदिग्धता असेल अशी दरपत्रके नाकारली जाण्यास पात्र ठरेल.

४) दरपत्रकामधील दर हे सर्व करांसहीत (जीएसटी सहीत) देणेत यावेत.

५) पुरवठा आदेश मिळाले पासून दिलेल्या मुदतीत साहित्य स्व:खर्चाने तसेच वाहतुक खर्चासहीत व इतर सर्व करासह आपण कार्यालय सांगेल त्याठिकाणी पोहोच करणेचे आहे.

६) अंदाजित दर्शविलेल्या साहित्याची खरेदी कमी किंवा जास्त होण्याची शक्यता आहे.

७) **अनामत रक्कम :-** ज्या दरपत्रकधारकाचे दर स्वीकृत केली जाईल त्या दरपत्रक धारकाने एकूण किंमतीच्या ५ टक्के एवढी सुरक्षा ठेव रक्कम वैद्यकिय अधिकारी, वर्ग १ रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र, सीपीआर कोल्हापूर खाते क्र. 635801050506 मध्ये ऑनलाईन NEFT/TRANSFER पध्दतीने भरावी. या रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.

८) अनामत रक्कमेचा भरणा व करारनामा कळविलेल्या दिवशी परंतु कोणत्याही परिस्थित एक आठवडयाच्या आत भरणे बंधनकारक राहिल. मुदतीत अनामत रकमेचा भरणा केला नाही व करारनामा करुन दिला नाही तर त्याची दरपत्रक रदद् समजणेत यईल व त्यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेत येईल.

९) चहा, नाष्टा व जेवण यांचेकरिता नमुद केलेल्या दरांची सरासरी काढून कमी सरासरी असणा-या दरपत्रकाची निवड करणेत येईल. दर समान आलेस महिला बचत गट /नोंदणीकृत महिला मंडळ यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच शासन निर्णय क्र.माविम-२००१प्र.क्र. १६७/का-१० दि.३ ऑक्टोबर २००१ नुसार अंमलबजावणी करणेकामी कार्यालयाकडील विविध मार्गदर्शनाच्य अधिन राहुन निर्णय घेणेचे अधिकार मा. जिल्हा शल्यचिकीत्सक सीपीआर हॉस्पीटल कोल्हापूर यांचेकडे राखुन ठेवणेत आलेले आहेत.

१०) प्रशिक्षण मार्गदर्शन सुचना मधील रक्कम रुपये १५०/- मधुन दोन वेळचे जेवण, एक वेळेला नाष्टा व २ वेळा चहा (निवासी प्रशिक्षणाकरीता) पुरविणे आवश्यक राहिल तसेच प्रशिक्षण नॉम रक्कम रु.१००/- मधुन एकवेळेला जेवण, एक वेळेला नाष्टा व दोन वेळ चहा (अनिवासी प्रशिक्षणाकरीता) तसेच प्रशिक्षण नॉर्म रक्कम रु.१२५, १६०, २०० इ. मंजुर असलेस प्राप्त दरामधुन ऑर्डर दिली जाईल.

११) सदर बाबीकरता सन २०२५-२६ मध्ये शासनाकडून मंजूरी व अनुदान उपलब्ध झाले तरच कंत्राटी आहार सेवा सुरु ठेवली जाईल.

१२)कोणत्याही परिस्थितीत अग्रिम संस्थेकडून दिला जाणार नाही.

१३)दरपत्रकातील दर हे फक्त Agency Nonimate करणेकरीता निश्चित केले जातील. शासनाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शक सुचनेनुसार दिलेले दर याला अधीन राहून देय्यके अदा करणेत येतील.

१४) दरपत्रक कालावधीमध्ये कोणतेही कर लागू झाले/वाढून आलेस मंजूर निविदेतील दर वाढवून मिळणार नाहीत. सदर सर्व कर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

१५) मांसाहारी **अमर्यादीत** थाळीमध्ये सर्व जिन्स्स अमर्यादीत पुरवावे लागतील व मांसाहारी **मर्यादीत** थाळीमध्ये चिकन, मटण व अंडाकरी प्लेट वगळता इतर जिन्नस अमर्यादीत पुरवावे लागतील.

१६) प्रशिक्षणार्थींची संख्या सर्वसाधारण १५ ते ४० असेल तसेच कार्यशाळेवेळी सदरची संख्या जास्तीत जास्त होवू शकते.

१७) प्रशिक्षण कालावधी कमीत कमी एक/दोन/तीन/पाच/आठ/पंधरा/एकवीस दिवसांचा असेल.

१८) दरपत्रक धारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर सही व शिक्का असणे आवश्यक आहे, त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.

१९) प्रशिक्षणार्थींना चहा/नाष्टा व जेवणाचा दर्जा उत्तम प्रकारचा रहाणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींकडून आपणांबाबत काही तक्रार झालेस आपली मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी आपणांस पूर्व सूचना न देता रदद् करणेत येईल.

२०) प्रशिक्षणार्थींची प्रक्षेत्र भेट व कार्यशाळा ज्याठिकाणी असेल तेंव्हा त्या प्रक्षेत्राच्या/कार्यशाळेच्या ठिकाणी चहा,नाष्टा व जेवण सुविधा स्वखर्चाने उत्तम प्रतीचे पुरविणे बंधनकारक राहील.

२१) प्रशिक्षणार्थींना भोजन वाढण्यासाठी निविदाकाराने नेमलेला कर्मचारी वर्ग स्वच्छ, निरोगी, टापटीप तसेच निर्व्यसनी असावा.

२२) दरपत्रकधारकाने नेमलेले कर्मचारी कोणत्याही गुन्हयांशी अथवा कायदेभंग विषयक प्रकरणाशी संबंधीत नसतील याची दक्षता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

२३) अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्याचे पालन करण्याची तसेच त्या अंतर्गत कोणत्याही कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहिल.

२४) अन्नविषबाधा होऊन शारिरीक /जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेचा ठेकेदारांची राहील.

२५) काही कारणास्तव भोजन सुविधा पुरविणे ठेकेदारास शक्य नसल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे त्यानंतर करार संपुष्टात येईल.

२६) दरपत्रकधारकाने भोजन पुरवठा दर्जेदार करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी उत्तम दर्जाचे किराणा माल, वस्तु, मसाले, भाजीपाला व कच्चा माल वापरला पाहिजे. जिल्हा शल्यचिकीत्सक/वै.अ.वर्ग १ रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास/ क़र्मचाऱ्यास केव्हाही स्वयंपाकगृह तसेच पुरविण्यात येणारे साहित्य कोणत्या प्रकारचे आहेत हे तपासण्याचे अधिकार राहतील. गरज भासल्यास साहित्याची (किराणा माल, वस्तु, तेल, मसाले इ.) शासकिय/खाजगी प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेतली जाईल. प्रयोगशाळेचे तपासणी शुल्क ठेकेदारास अदा करावे लागेल. तपासणीमध्ये साहित्याचा दर्जा योग्य नसल्याचे आढळून आल्यास दरपत्रकधारकाचा ठेका रद्द करण्यात येईल.

२७) सकाळचा नाष्टा, दोन वेळेचा चहा, बिस्किट व दुपारचे/रात्रीचे जेवण प्रशिक्षणाच्या ठिकाणी वेळेवर स्वखर्चाने उत्तम प्रतीचे पुरविणे आवश्यक आहे.

२८) प्रशिक्षणार्थी यांचे प्रत्यक्ष उपस्थित संख्येनुसार चहा, नाष्टा व जेवणाची रक्कम निविदेमधील मंजूर दराप्रमाणे दरमहा PFMS/NEFT व्दारे अदा करणेत येईल. तसेच प्रत्येक बिलातून टी.डी. एस.ची. रक्कम कपात करणेत येईल.

२९) संबंधित आहार पुरवठादारास व त्यांच्या कामगारांना कंत्राटी स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच शासन सेवेत कोणतेही हक्क राहणार नाहीत याबाबत ठेकेदारांने संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना पूर्वकल्पना दयावी. याबाबत काही वाद निर्माण होणार नाहीत याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

३०) कामावर असताना कोणतेही दुर्घटना झाल्यास व कंत्राटी कर्मचाऱ्यास दुखापत/मुत्यू सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी (आवश्यकता भासल्यास) कंत्राटदाराची राहील. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी, अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी

कंत्राटदाराची राहील. या अनुषंगाने नियमानुसार योग्य त्या इन्शुरन्स करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत हे कार्यालय/आरोग्य विभाग कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

३१) मागासवर्गीय संस्था/अपंग संस्था यांना बयाना रक्कम सुट मागावयाची असल्यास त्या संस्थेच्या नावानिशी शासन निर्णयाची प्रत जोडण्यात यावी.

३२) मंजुर दरपत्रकाची मुदत ही दरपत्रक मंजुर झालेल्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीकरीता पर्यंत राहील. सदर कालावधी संपल्यानंतर नवीन निविदा अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्तीनुसार दोघांच्या संमतीने तीन महिन्याच्या कालावधीसाठी किंवा पुढील नवीन निविदा अस्तित्वात येईपर्यंत चालू राहील.

३३) मंजुर निविदाधारकाने शर्ती व अटींचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निर्देशनास येताच पूर्वसुचनेशिवाय कंत्राट रद्द करण्यात येईल आणि मंजुर दरपत्रधारकाचे नाव काळया यादीत घालून हमी रक्कम (सिक्युरिटी डिपॉझीट) जप्त करण्याबाबतची कडक कारवाई करण्यात येईल.

३४) आहार सेवेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील

अ) चहा – नाष्टा :- सकाळी ८.०० ते १०.००
ब) दुपारचे जेवण :- दुपारी ०१.०० ते २.३०
क) दुपारचा चहा :- दुपारी ४.०० ते ५.००
ड) रात्रीचे जेवण :- रात्री ७.३० ते ९.३०

अ) संस्थेमध्ये चव रजिस्टर ठेवले जाईल. संस्थेचे अधिकारी/कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी भोजनातील समाविष्ठ अन्नपदार्थांची चव घेऊन तसा शेरा रजिस्टरमध्ये नोंदवतील. चहा, नाष्टा व भोजनाच्या चव, दर्जाबद्दल नकारात्मक शेरे असतील तर निविदाकारास लेखी समज दिली जाईल. त्यानंतरही वारंवार नकारात्मक शेरे असतील तर दरपत्रकधारकाचा ठेका रद्द करण्यात येईल.

अब) आहार पुरवठादाराने प्रशिक्षण केंद्रातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची भरपाई संबंधित ठेकेदारास देय होणाऱ्या रक्कमेतून वसूल केली जाईल.

अबक) निविदाधारकाने सदर कामासाठी उपठेकेदार नेमू नयेत. उपठेकेदार नेमलेचे निदर्शनास आलेय ठेका रद्द करणेत येईल.

अबकड) दरपत्रक हे अर्ज कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच निविदा उघडयाचे तारखेत व वेळेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशिक्षण केंद्र प्रमुखांनी राखून ठेवलेले आहेत.

अबकडइ) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर ८ दिवसांमध्ये करारनामा रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर (स्वःखर्चाने) वेगळा करावा लागेल. तसेच मंजुर झालेल्या दराप्रमाणे वार्षिक अंदाजीत खर्च रकमेच्या ५% रक्कम सिक्युरिटी म्हणून रु.२५,०००/- (पंचवीस हजार फक्त) ऑनलाईन भरणेत यावेत. कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा ठेका त्यांने व्यवस्थितरित्या पूर्ण केल्यानंतर व संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई नसल्यास संबंधित ठेकेदाराची सुक्युरिटी डिपॉझिट विहीत कालावधीनंतर परत करण्यात येईल.

अप) सदर निविदा प्रक्रियेबाबतच्या न्यायप्रविष्ठ बाबी कोल्हापूर शहर न्याय परिक्षेत्रात मर्यादीत राहतील.

३५) बंधपत्र

मी/आम्ही गांभीर्यपूर्वक नमूद करीतो की मी/आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पुरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निवेदेसाठी माझे/आमचे दर निविदे सोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे/आहोत.

जर माझी/आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधिल राहू. या अटी व शर्तीचा भंग मी/आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीला नुसार मी/आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी/आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीला नुसार अट क्र. १ ते ३४ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक :

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नांव ..........................

पत्ता ..........................

जिल्हा शल्यचिकीत्सक,
कोल्हापूर

दरपत्रकधारकांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना

## हमीपत्र

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध/संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारे थेट स्वारस्य नाही. सदर जाहीर सुचनेमधील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला/आमच्या संस्थेस मान्य आहेत.

दरपत्रकधारकाची सही व संस्थेचा शिक्का